## नाशिक महानगरपालिका,नाशिक
## गोदावरी संवर्धन कक्ष

**प्रस्तावना -**

नाशिक महानगरपालिकामध्ये जनहित याचिका १७६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये गोदावरी संवर्धन कक्ष विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. नाशिक महानगरपालिका क्षेत्रामधून वाहणाऱ्या पवित्र गोदावरी नदीचे पात्र व दोन्ही तिरांवरील १००-१०० फुटाचा किनाऱ्यांचा परिसर या विभागाचे कार्यक्षेत्र राहिल असे मा.आयुक्त सा ो. यांनी आदेश क्र.७३, दि.१४/०१/२०१५ नुसार आदेशीत केलेले आहे.

**कामकाजाचे स्वरुप :-**

१.या विभागाचे कामकाज हे अत्यावश्यक सेवेमध्ये अंतर्भुत आहे.
२.सांडपाणी मिसळण्याची ठिकाणे शोधुन त्यास प्रतीबंध करणे .
३.पाणवेली व तत्सम तरंगणारा कचरा उचलणे.
४.नदी पात्रा लगत खुले शौच , कपडे, वाहने, जनावरे इ. धुणे पुर्णत: बंद करणे साठी संबंधित विभागामार्फत कार्यवाही करणेसाठी समन्वय साधून कार्यवाही करणे.
वरील नमुद केलेले कामे हे संबंधित विभागाशी समन्वय साधून योग्य ती कार्यवाही करणेत येते.

**समिती :-**

गोदावरी व तिच्या उपनद्यां स्वच्छता ठेवणेकामी मा.उच्च न्यायालयाद्वारे समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदरील समितीच्या सदस्यांचे नावे खालील प्रमाणे :-
१. मा.विभागीय आयुक्त सा ो, नाशिक - अध्यक्ष
२. मा.मनपा आयुक्त, नाशिक
३. मा.जिल्हाधिकारी, नाशिक
४. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्राधिकृत प्रति निधी
५. डॉ.प्राजक्ता बस्ते, प्राचार्या, वास्तुशास्त्र महाविद्यालय, नाशिक
६. “नीरी” या केंद्र शासनाच्या संस्थेचे प्रतिनिधी

**अधिकारी व कर्मचारी निर्देशिका :-**

| अ.क्र. | पदनाम | कामकाजाची जबाबदारी |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता तथा पर्यावरण संवर्धन अधिकारी | गोदावरी संवर्धन कक्षाचे विभागप्रमुख म्हणून कामकाज पाहणे. |
| २ | सहाय्यक आयुक्त तथा विभागीय अधिकारी पंचवटी | गोदावरी कक्षाचे सहाय्यक आयुक्त या पदाचा अतिरक्त कार्यभार सोपविणेत येत आहे. |
| ३ | आरोग्य वैदयकिय अधिकारी | स्वच्छते संदर्भातील सर्व कामांची नियंत्रण करण्याकरीता समन्वय अधिकारी या नात्याने काम सोपविण्यात येत आहे. |
| ४ | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) | सध्याच्या कार्यभार सांभाळून गोदावरी नदी संवर्धनाचे अनुषंगीक कामकाजाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे. |
| ५ | उप अभियंता (स्थापत्य) | सध्याच्या कार्यभार सांभाळून गोदावरी नदी संवर्धनाचे अनुषंगीक कामकाजाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे. |
| ६ | सहाय्यक कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | सध्याच्या कार्यभार सांभाळून गोदावरी नदी संवर्धनाचे अनुषंगीक कामकाजाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे. |
| ७ | शाखा अभियंता (यांत्रिकी) | सध्याच्या कार्यभार सांभाळून गोदावरी नदी संवर्धनाचे अनुषंगीक कामकाजाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे. |
| ८ | स्वच्छता निरीक्षक | सध्याच्या कार्यभार सांभाळून गोदावरी नदी संवर्धनाचे अनुषंगीक कामकाजाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे. |
| ९ | सहा.अधिक्षक व कार्यासन क्र.३ | गोदावरी संवर्धन कक्षाचे कार्यालयीन कामकाज |
| १० | कनिष्ठ लिपिक व कार्यासन क्र.२ | गोदावरी संवर्धन कक्षाचे कार्यालयीन कामकाज |
| ११ | कनिष्ठ लिपिक व कार्यासन क्र.१ | गोदावरी संवर्धन कक्षाचे कार्यालयीन कामकाज |
| १२ | शिपाई | गोदावरी संवर्धन कक्षाचे कार्यालयीन कामकाज |

Sd/-
कार्यकारी अभियंता (गो.सं.क)
नाशिक महानगरपालिका,नाशिक